आर.आर. एज्यूकेशन ट्रस्ट, मुलुंड, मुंबई
या संस्थेला अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था
म्हणून मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग,
शासन निर्णय, क्र. एसएमसी-१००४/(१३९/२००४) असंक.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३० जून, २००४.

संदर्भ:- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएमसी-१००१/(१३७/०१)/असंक, दिनांक १७ जुलै २००२.
२) शासन निर्णय क्र. एसएरएन-२१०३/(५०/०३)/माशि-२, दिनांक २७ मे, २००३
३) शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई, मुंबई यांचे पत्र क्र.शिउसं/माध्य-६/१३४८-४९, दि. २५ जून,२००४

प्रस्तावना:- भारतीय संविधानातील अनुच्छेद २९ व ३० (१) अन्वये अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक संस्थांना असलेले शैक्षणिक संरक्षणविषयक अधिकार या संदर्भात मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय, केंद्रशासन व राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एनसीटीई), नवी दिल्ली तसेच राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या उच्चाधिकार समिती यांनी याबाबत वेळोवेळी विहित केलेली मार्गदर्शक तत्वे/आदेश विचारात घेऊन कोणत्या शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक (धार्मिक/भाषिक) संस्था समजण्यात यावे, याबाबतचे निकष, अटी व कार्यपध्दती संदर्भ १) येथील शासन निर्णय, दि १७ जुलै २००२ अन्वये विहित करण्यात आली आहे. या शासन निर्णयाच्या अधीन "आर.आर. एज्यूकेशन ट्रस्ट, मुलुंड, मुंबई" या संस्थेस अल्पसंख्याक दर्जा देण्यासंबंधी विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी संदर्भ क्र. (३) येथील त्यांच्या दिनांक २५ जून,२००४ च्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यानुसार सदरहू संस्थेला हिंदी (भाषिक) अल्पसंख्याक संस्था म्हणून मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- भारतीय संविधानातील अनुच्छेद २९ व ३० (१) अन्वये विहित तरतुदीच्या अनुषंगाने अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थाना असलेले शैक्षणिक संरक्षणविषयक अधिकार आणि या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ११ सदस्यीय खंडपीठाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २००२ रोजी दिलेल्या न्याय निवाड्याच्या अधीन शासन निर्णय, दिनांक २७ मे, २००३ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आदेश तसेच शासन निर्णय, दिनांक १७ जुलै, २००२ मधील तरतुदीच्या अधीन राहून "आर.आर. एज्यूकेशन ट्रस्ट, मुलुंड, मुंबई" या संस्थेला शालेय शिक्षण विभागाच्या कार्यक्षेत्रातील त्या संस्थेच्या मान्यताप्राप्त शाळांतील विद्यार्थी प्रवेश तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ च्या कलम ३ (२) अन्वये कर्मचाऱ्यांच्या नेमणुका

R. R. EDUCATIONAL TRUST'S COLLEGE OF EDUCATION & RESEARCH
B.Ed. COLLEGE.

Principal

करणे यासाठी सदरहू संस्थेला हिंदी (भाषिक) अल्पसंख्याक संस्था म्हणून खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे:-

(१) सदरहू "आर.आर. एज्यूकेशन ट्रस्ट, मुलुंड, मुंबई" या संस्थेला अल्पसंख्यांक संस्था म्हणून त्या संस्थेच्या शालेय शिक्षण विभागाशी संबंधित मान्यताप्राप्त शाळांतील विद्यार्थी प्रवेश व अधिनियम, १९८७ च्या कलम ३(२) अनुसार कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करणे यासाठी सवलती लागू राहतील.

(२) या आदेशान्वये अल्पसंख्यांक संस्था म्हणून दिलेल्या मान्यतेचा संस्थेने कोणत्याही प्रकारे गैरवापर केला असल्याचे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी केल्यानंतर प्रथमदर्शनी आढळून आल्यास, संस्थेला कारणे दाखवा नोटीस देऊन (त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन) अल्पसंख्यांक संस्था म्हणून दिलेली मान्यता रद्द करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. अशा प्रकरणी, गैरप्रकार किंवा गैरव्यवहार कोणत्या प्रकारचा व किती गंभीर स्वरुपाचा आहे याचा विचार करुन अल्पसंख्याक संस्था म्हणून दिलेली मान्यता रद्द करण्याच्या कार्यवाहीसह शासनाने संस्थेच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना विहित कार्यपध्दती/नियमानुसार शैक्षणिक मान्यता/परवानगी दिली असल्यास अशी शैक्षणिक मान्यता रद्द करण्याबाबतही विहित कार्यपध्दतीनुसार कारवाई केली जाईल.

३) या आदेशान्वये दिलेल्या मान्यतेचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केला असल्याचे आढळून आल्यास दिलेली अल्पसंख्याकाची मान्यता रद्द करण्यात येईल. विभागाच्या अधिकाऱ्यांकडून चौकशी केल्यानंतर प्रथमदर्शनी असे आढळून आल्यास, संस्थेला कारणे दाखवा नोटीस देऊन (त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन) मान्यता रद्द करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. अशा प्रकरणी, गैरप्रकार किंवा गैरव्यवहार कोणत्या प्रकारचा व किती गंभीर स्वरुपाचा आहे याचा विचार करुन अल्पसंख्याक म्हणून दिलेली मान्यता रद्द करण्याशिवाय संस्थेला किंवा शाळेला विभागाने किंवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दिलेली शैक्षणिक मान्यता रद्द करण्याबाबतही विहित कार्यपध्दतीनुसार कारवाई केली जाईल.

४) तसेच संस्थेचे मान्यताप्राप्त अध्यापक विद्यालय असल्यास त्याबाबतीत शासनाने तसेच एनसीटीई, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वे व अटींचे पालन/पूर्तता न केल्याचे आढळून आल्यास विहित कार्यपध्दतीप्रमाणे संस्थेविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सुभाष फाटक )
उपसचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
विभागीय शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई, मुंबई.
शिक्षण निरीक्षक (उत्तर विभाग), बृहन्मुंबई, मुंबई
सचिव, आर.आर. एज्यूकेशन ट्रस्ट, जी-७, समुन हाऊस, श्रीमती सरोजिनी नायडू रोड मुलुंड (पश्चिम), मुंबई-८०
कार्यासन [illegible] /माशि-१, शालेय शिक्षण विभाग
निवड नस्ती असंक.

R.R. EDUCATIONAL TRUST'S COLLEGE OF EDUCATION & RESEARCH
B.Ed. COLLEGE